# MT- 162

Seat No. | | | | | | | |

**2014 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - III

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.1. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

1) 'माझे विद्यापीठ' ला एकूण अकरा पुरस्कार मिळाले, ..........
अ) पण एकाही समारंभाला मी गेले नाही. ब) पण तरीही ते नाखूष होते.
क) ते पाहून मी खूप खूष झाले.

2) नंतर एक नाग शिरला बिळात आणि बसला ..........
अ) बीळ व्यापून. ब) घर व्यापून. क) वारूळ व्यापून.

3) सगळ्यांच्या घरात सहा खुर्च्यांचा ..........
अ) सोफासेट असतो. ब) दिवाण असतो. क) डायनिंग असतो.

4) मला सुद्धा ती करण्याचा 'हक्क' आहे म्हणून ..........
अ) स्वतः ती कामे ते करत. ब) उपाशी राहून ती कामे ते करत.
क) ते ही कामे देखील करत.

**प्र.1. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

1) माझी एक कित्येक वर्षांची .......... मैत्रीण आहे.
(जिवलग, जिवाभावाची, जुनी)

2) पुस्तकरावाच्या शर्टवरची कविता जवळ जाऊन मंदार .......... लागतो.
(पाहू, वाचू, लिहू)

3) ह्या सर्वांच्या आवाजानं आपण शांततेवर केवढे .......... ओरखडे काढतो आहोत.
(कर्कश, विचित्र, भयंकर)

**प्र.1. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या जीवनाला कशाचा कधीही स्पर्श झाला नाही ?

2) मुक्त तुरुंगात सारे कोण होते ?

3) बहिणाबाईंच्या शब्दात काय हरवते असं वाटतं ?

**प्र.2. अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

1) ''आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जात नाही.''
2) ''निखळ आनंद घेताना धर्माच्या भिंतींनी कधी अडसर केला नाही.''

**प्र.2. आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) नागिणीचे शहाणपण कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?
2) आनंदवन कसं निर्माण झालं ?
3) बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोणते कष्ट घेतले ?
4) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?
5) स्वामी विवेकानंद यांनी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे यासाठी चेतूने आग्रह कसा केला ?

**प्र.3. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) माणसे कसला भार वागवत असतात ?
2) शिळा कोण फोडतात ?
3) आपल्या हृदयातून कोणता समान झोत वाहतो असे कवयित्रीला वाटते?

**प्र.3. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

1) बालरवि-किरणांची नाचे इथे .......... ! (प्रभावळ, ओहोळ, मोहोळ)
2) .......... मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी. (झुरते, रेंगाळते, धावते)
3) देश आमुचा आहे 'अल्ला' तोच 'प्रभू' अन् तो '..........'.(येशू, विठ्ठल, भगवान)

**प्र.4. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

1) 'मातीलाही सुगंध यावा कष्टाच्या भाकरीचा.'
2) 'कृपा करी पंढरीनाथा । दीनानाथ तूं समर्था ।।
अपराध करी क्षमा । तुझा न कळे महिमा ।।'

**प्र.4. आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) कवीला आपल्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?
2) कवयित्रीने आपल्या देशातील वेगळेपण कसे वर्णिले आहे ?
3) संत सोयराबाई यांनी संसाराची तुलना मृगजळाबरोबर कशी केली आहे ?
4) कवीला गावातील आमराई, नदी, शेत का आवडते ?
5) प्रलय होताना कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

1) आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला का वाटले?
2) नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यचळवळीत कसा भाग घेतला ?
3) कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
4) रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना काय केले पाहिजे असे लेखिकेला वाटते ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

1) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.
2) 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.6. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

1) मुंग्या स्तबध होऊन ऐकत होत्या.
2) मी पर्वा एक मूक्त तुरूंग पाहिला.

**प्र.6. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

1) पंचप्राण 2) मायलेक 3) दीडदोन 4) पानपत्रावळ

**प्र.6. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

1) भाषेचे मूळ कोणी कशाला पाहावे ? (आज्ञार्थी करा.)
2) आपल्या गाण्याची किंमत पैशात करू नकोस. (प्रश्नार्थी करा.)
3) आतापर्यंत मी नसती चौकशी कधी केली आहे काय ? (विधानार्थी करा.)

**प्र.6. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(भांडवल करणे, अस्वस्थ होणे, मोहरून टाकणे, सांडलवंड करणे, खूणगाठ बांधणे, मनाई करणे)

1) दिवाळीच्या प्रसन्न सुरांनी वातावरण फुलून गेले.
2) परिस्थितीचा वापर करून कधी सहानुभूती मिळवू नये.
3) तो अपघात मला कायम बेचैन करतो.
4) राधा काम करताना खूप गोष्टी वाया घालवते.
5) अभ्यास करत नाही म्हणून आईने रमेशला खेळायला नकार दिला.
6) वार्षिक परीक्षेत ९० टक्के गुण मिळविण्याचा गणेशने निश्चय केला.

**प्र.7.** **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** **4**

ज्या जगात मी आलो ते जग मृत्यूपूर्वी मी सुंदर करून जाईन, अशी जिद्द हवी. आपण जीवनाकडे पाहतच नाही. तरूण असंतुष्ट म्हणून ओरड होते. मी म्हणतो, तरूण असंतुष्ट नाहीत, तो काय देश आहे? तरूणांनी असंतुष्टच राहिले पाहिजे. पण ते या अर्थाने की त्यांनी जीवनाचे आव्हान स्वीकारायचे. 'प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा.' असे केशवसुतांनी सांगितले आहे. त्यातील 'लेणी' हा शब्द सुंदर आहे. कलानिर्मिती ही अवघड कामगिरी आहे. ही निर्मिती सहजासहजी होत नाही. त्यासाठी पत्थर फोडून त्याच्याशी झुंज द्यावी लागते. हे आव्हान तुम्ही स्वीकारा, तशी जिद्द बाळगा, एवढेच माझे आजच्या तरूण पिढीला सांगणे आहे.

**प्र.7.** **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा. (कोणतीही एक)** **4**

1) **मुद्दे** : एक तलाव – बडबडे कासव – दोन बगळे – मैत्री – तलाव आटणे – दुसऱ्या तलावात जाण्याचा विचार – कासवाला उपाय सुचविणे – बगळ्यांनी काठीच्या मदतीने कासवाला घेऊन जाणे – कासवाचे मधेच बडबडणे – उंचावरून खाली पडणे – परिणाम – तात्पर्य.

2) **मुद्दे** : एक लहान बालक – गरीब आईबरोबर झोपडीत राहणे – पावसाळ्याचे दिवस – भयंकर वारा व पाऊस – रेल्वेरूळ उखडणे – त्याच्या नजरेत येणे – अंगातला तांबडा शर्ट काढून आगगाडी थांबवणे – प्रवाशांचा संताप – इंजिन ड्रायव्हरची रूळावर नजर पडणे – रूळ वाहून गेलेले – मुलामुळे प्रवाशांचे प्राण वाचणे – राष्ट्रपतीद्वारा मुलाचा सन्मान – तात्पर्य.

**प्र.7.** **इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** **4**

1) संगिता/ सुजित काळे, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, भांडूप (पूर्व) येथून शाळेसमारील रस्ता नादुरुस्त असल्या कारणाने विभागीय अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहिते/ लिहितो. (लिफाफा आवश्यक)

2) संदीप/ साधना बोरकर, मु. पो. खडवली, जि. ठाणे येथून पत्र लिहून अनियमित वीजपुरवठ्याबाबत विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ठाणे यांच्याकडे तक्रार करतो / करते. (लिफाफा आवश्यक)

<u>किंवा</u>

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शाळेच्या क्रीडामहोत्सव समारंभाचा वृत्तांत लिहा.

<u>किंवा</u>

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

स्टेशनरीच्या दुकानाची जाहिरात करा.

**प्र.8. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

1) परीक्षा रद्द झाल्या तर ........

**मुद्दे** :- एक मजेदार कल्पना - परीक्षांचे विविध प्रकार - परीक्षांमुळे विद्यार्थ्यांवर येणारी बंधने - परीक्षा नसल्यामुळे होणारे फायदे-तोटे - परीक्षांची आवश्यकता.

2) शेतकऱ्याचे आत्मवृत्त

**मुद्दे** :- नाव - गाव - शिक्षण - शेतीच्या कामाची लहानपणापासून सवय - कष्टमय जीवन - शेतीची अवस्था - रेडिओ, दूरदर्शन, वरील माहितीचा शेतीत उपयोग - नवीन शोध, आधुनिक उत्पादनाच्या पद्धती औषधे, बी, खते, साहित्य - नव्या पिढीचे विचार - शेतीकडे दुर्लक्ष - शेवट.

३) माझे आवडते शिक्षक

**मुद्दे** :- शिक्षकाचे नाव - त्यांचा शिकविण्याचा विषय - शिक्षक आवडण्याची कारणे - त्यांचा स्वभाव - गुण, राहणी - विद्यार्थ्यांना नेहमी मदत - शिकविण्याचे कौशल्य - त्यांच्याविषयी प्रेम - आदर - आपल्या जीवनात त्याचे स्थान - शेवट.

**Best Of Luck**

**PAPER - III**

# MT-162

**2014 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - III**

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.**1.** | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | 'माझे विद्यापीठ' ला एकूण अकरा पुरस्कार मिळाले, पण एकाहीं समारंभाला मी गेले नाही. | **1** |
| 2) | नंतर एक नाग शिरला बिळात आणि बसला घर व्यापून. | **1** |
| 3) | सगळ्यांच्या घरात सहा खुर्च्यांचा डायनिंग असतो. | **1** |
| 4) | मला सुद्धा ती करण्याचा 'हक्क' आहे म्हणून ते ही कामे देखील करत. | **1** |
| उ.**1.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | माझी एक कित्येक वर्षांची जिवलग मैत्रीण आहे. | **1** |
| 2) | पुस्तकरावाच्या शर्टवरची कविता जवळ जाऊन मंदार वाचू लागतो. | **1** |
| 3) | ह्या सर्वांच्या आवाजानं आपण शांततेवर केवढे कर्कश ओरखडे काढतो आहोत. | **1** |
| उ.**1.** | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या जीवनाला चंगळवादाचा कधीही स्पर्श झाला नाही. | **1** |
| 2) | मुक्त तुरुंगात सारे गुन्हेगार होते. | **1** |
| 3) | बहिणाबाईंच्या शब्दात 'निजखूण' हरवते असं वाटतं. | **1** |
| उ.**2.** | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील वाक्य 'अपूर्व भेट' या 'रणजित देसाई' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र एका कलावंताला म्हणजे राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे मनोज्ञ चित्रण आलेले आहे.<br>**स्पष्टीकरण** : स्वामी विवेकानंद म्हणजे एक महान विचारवंत होते. महान तत्वज्ञानी होते. त्यांचा हिंदू धर्माबद्दलचा अभ्यास खूप सखोल होता. त्यांनी हिंदू धर्माबद्दल भारतात आणि परदेशात खूप व्याख्याने दिली होती. परंतु चित्रकलेचे खरे राजा 'राजा रविवर्मा' यांनी याच हिंदू धर्माची दैवतं चित्रांच्या रूपानं घरोघरी पोहोचवली होती. स्वामी विवेकानंद शिकागोहून परत आले त्या दिवसापासून त्यांना राजा रविवर्मा यांच्या भेटीची ओढ लागली होती. पण कोणत्याही परक्या माणसाच्या घरी न कळवता जाणे हा स्वामींचा स्वभावधर्म नव्हता. परंतु, राजा रविवर्मा यांच्याबद्दल आपलेपणा, प्रेम जाणवल्यामुळे त्यांचे कौतुक आणि अभिनंदन करण्यासाठी स्वामीजी त्यांच्या घरी अनाहूतपणे गेले होते.<br>**वैशिष्ट्य** : स्वामी विवेकानंद यांची राजा रविवर्म्यांबद्दल आपुलकीची भावना येथे दिसून येते. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **<u>संदर्भ</u>** : वरील वाक्य 'उरूसाचे दिवस' या लेखिका 'आशा आपराद' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखिकेने पन्हाळगडावरील उरूसाच्या आठवणी सांगत बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविलेले आहे.<br>**<u>स्पष्टीकरण</u>** : लेखिकेच्या घरी दोन ईद मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जात. यावेळी गल्लीतील सगळे लोक, मैत्रिणी घरी जेवायला येत. पन्हाळ्याचा उरूसही असाच आनंदात साजरा होई. पन्हाळ्याचा दरगाह आणि तेथे होणारा उरूस म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रतिक असलेले पवित्र स्थान आहे. या दरगाहला मुस्लिमांच्या इतकेच किंबहुना जास्तच हिंदू भक्त आहेत. सर्व जातीधर्माचे लोक तेथे सजून-धजून स्त्रिया, मुलांबाळांसह दर्शनाला येत असत. तेथे मुस्लिमांच्या मन्नतबरोबर हिंदूंचे नवसही बोलले जात. असे सगळे सण, उत्सव, ईद आणि उरूस साजरे होताना हा हिंदूंचा सण व मुसलमानांची ईद असा दुजाभाव कधीच होत नसे. उत्सवाचा निखळ आनंद घेताना अशा भेदभावाच्या भिंतींनी कधीच अडसर केला नाही.<br>**<u>वैशिष्ट्य</u>** : सर्वधर्मसमभावाची भावना येथे दिसून येते. | **3** |
| उ.**2.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | <u>'वारूळ'</u> हा पाठ लेखक <u>'अनिल त्र्यंबक अवचट'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने वारुळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटर प्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुले माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होणार असतो पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारूळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. त्यांच्यामुळे सूर्य किरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाही. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वतःही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या.<br>वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते. | **3** |
| 2) | <u>'माणुसकीचा झरा'</u> हा पाठ लेखिका <u>'चित्रलेखा पुरंदरे'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>एक दिवस रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला, नासलेल्या शरीराचा तुळशीराम बाबांना दिसला. त्याची ती दुरावस्था बघून त्यांना खूप दुःख झाले. त्यावेळेपासूनच | **3** |

| | | |
|---|---|---|
| | बाबांनी घरची श्रीमंती आणि सर्व सुखांचा त्याग करून आपले जीवन कुष्ठरोग्यांसाठी समर्पित केले. एका गरीब कुष्ठरोग्याला घरी आणून त्यांनी सर्व नातेवाईकांचा विरोध ओढावून घेतला. परंतु, याचवेळी सोबत म्हणून साधनाताईंच्या रूपात एक जीवाभावाचा माणूसही मिळाला. कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही असे मानणाऱ्या साधनाताईंनी बाबांना संपूर्ण साथ दिली. परंतु दुर्दैवाने याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्यावेळी दुःखी झालेल्या बाबांनी ताईंजवळ आपल्या अस्वस्थतेची, दुःखाची कबुली दिली. या दुःखाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास यावेळी या पतीपत्नीला लागला. या ध्यासातूनच आनंदवनाची निर्मिती झाली.<br>अशाप्रकारे कुष्ठरोग्यांच्या दुःखाच्या सहानुभूतीतून आनंदवन निर्माण झाले. | |
| 3) | <u>'बाबूजी'</u> हा पाठ लेखक <u>'संजय गिरासे'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>'बाबूजी' हे लेखकाच्या गावातील एक चांगले व्यक्ती होते. ते नेहमी दुसऱ्यांच्या मदतीला धावून जायचे. केशव आणि सरिता ही दोन मुले त्यांना होती. गावात शिक्षणाची सोय नव्हती म्हणून शिक्षणासाठी दोघांना बाबूजींनी नाशिकला ठेवलं. त्यांच्या शिक्षणावर खूप पैसा खर्च केला. स्वतः बाबूजी उपाशी राहिले पण पोरांना त्यांनी काही कमी पडू दिले नाही. केशवला इंजिनीअर केले. त्याच्या नोकरीसाठी प्रयत्न केले. भरपूर हुंडा देऊन आर्किटेक्ट असलेल्या सरिताचे इंजिनीअर मुलाशी लग्न करून दिले. सरिताने स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केलेला होता. बाबूजींनी केशवसाठी ग्रॅज्युएट मुलगी शोधली आणि लग्न करून दिले.<br>अशाप्रकारे बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी खूप कष्ट घेतले. | **3** |
| 4) | <u>'संवाद, विसंवाद'</u> हा पाठ लेखिका <u>'शांता शेळके'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे.<br>मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजून असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो. पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळीकीमुळे एक चमत्कारिक अवघडलेपणा वाट्याला येतो. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहित असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहित असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.<br>या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 5) | '<u>अपूर्व भेट</u>' हा पाठ लेखक '<u>रणजित देसाई</u>' यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे.<br>स्वामीजी आसनस्थ झाल्यावर गोद वर्मा, राज वर्मा व रामय्या यांनी त्यांची पाद्यपूजा केली. हे सर्व चालू असताना चेतू रविवर्म्याला आत येण्याबद्दल खुणावत होता. त्रस्त मनानं रविवर्मा आत गेला. आत जाताच चेतूने रविवर्म्याचे पाय धरले. त्याला उठवत संतापाने रविवर्म्याने त्याला दटावले. त्यावर चेतू डोळ्यांतील पाणी पुसत म्हणाला, 'स्वामी तुमच्यामुळे देवदर्शन घडलं आहे. त्यांना आज घरात ठेवून घ्या. माझ्या गरिबाच्या हातचे चार घास त्यांनी स्वीकारले तर माझी कुळी उद्धरेल.' हे सारं सांगताना चेतूचे शरीर गदगदा हलत होते. चेतूची अवस्था पाहून व्याकुळ झालेला रविवर्मा त्याला बळजबरीने स्वामीजींच्या समोर घेऊन आला. स्वामीजींना पाहताच चेतूने त्यांना साष्टांग नमस्कार घातला व 'आपण हो म्हटल्याखेरीज हे पाय सोडणार नाही.' असे म्हणत त्यांच्या पायांशी तसाच पडून राहिला.<br>अशाप्रकारे स्वामी विवेकानंदांनी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे म्हणून चेतूने आग्रह केला. | **3** |
| उ.**3.** | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | माणसे मी, माझे असा भार वागवत असतात. | **1** |
| 2) | पाथरवटांचे संघ शिळा फोडतात. | **1** |
| 3) | आपल्या हृदयातून प्राणवायूचा समान झोत वाहतो. | **1** |
| उ.**3.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| 1) | बालरवि-किरणांची नाचे इथे <u>**प्रभावळ**</u> ! | **1** |
| 2) | <u>**रेंगाळते**</u> मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी. | **1** |
| 3) | देश आमुचा आहे 'अल्ला' तोच 'प्रभू' अन् तो '<u>**भगवान**</u>'. | **1** |
| उ.**4.** | **अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरल अर्थ लिहा.** | |
| 1) | <u>**संदर्भ**</u> : वरील पद्यपंक्ती '<u>प्रलय</u>' या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी '<u>रोहिदास पोटे</u>' आहेत. या कवितेत माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनाने जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br><u>**स्पष्टीकरण**</u> : समाजातील विषमता नष्ट होऊन समानता निर्माण व्हावी असे कवीला वाटते. माणसातील माणूसपण जपत असताना त्याच्या कष्टानांही महत्त्व प्राप्त व्हावे, असेही त्याला वाटते. कारण कष्टामुळेच माणसाला अर्थ प्राप्त होतो. माणसालाही माणसाच्या या कष्टांची किंमत कळावी. माणसाच्या कष्टांना मोल प्राप्त व्हावे, असे कवीला वाटते.<br><u>**वैशिष्ट्य**</u> : मानवी जीवनातील कष्टाचे महत्त्व सांगितले आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'कृपा करीं पंढरीनाथा' या अभंगातून घेतल्या आहेत. 'संत नरहरी सोनार' यांनी हा अभंग लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे.<br>**स्पष्टीकरण** : विठ्ठलाचे गुणवर्णन संत नरहरी सोनार मनापासून करतात. ते म्हणतात की, हे पंढरीनाथा आम्हा भक्तांवर तू नेहमीच कृपा कर. गोरगरीबांची मदत करणारा, त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी धावून जाणारा तू दीनानाथ आहेस. हे दीनांच्या नाथा तूच सर्वशक्तिमान, समर्थ आहेस. जीवन जगत असताना आमच्याकडून अनेक चुका होतात. अनेक अपराध घडतात. तू आमच्या अपराधांना क्षमा कर. हे पंढरीनाथा, तुझा महिमा अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्हाला कळत नाही, समजत नाही.<br>**वैशिष्ट्य** : अनोख्या शब्दांत विठ्ठलाचा मोठेपणा संत नरहरी सोनारांनी येथे व्यक्त केला आहे. | **3** |
| उ.**4.** | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'माझ्या घरट्यात' ही कविता कवी 'सूर्यकांत खांडेकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | **3** |
| 2) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन करताना कवयित्री इंद्रधनुष्याचे उदाहरण देते. जसे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान एकच असते. तशीच भारतातही ही विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा वेगळी आहे. परंपरा, पूजाअर्चा आणि परमेश्वर भक्तीचे त्यांचे मार्गही वेगवेगळे आहेत. त्याचबरोबर त्यांची वेशभूषा यामध्येही आपल्याला विविधता असल्याचे आढळून येते.<br>अशाप्रकारे कवयित्रीने आपल्या देशातील विविध बाबतीतील वेगळेपण वर्णिले आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 3) | 'किती हें सुख' हा अभंग 'संत सोयराबाई' यांनी लिहिला आहे. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मी पणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे.<br>मृगजळ म्हणजे पाण्याचा आभास असतो. मृगजळ हे नेहमी फसवे असते. संसारातील सुखही असेच मृगजळासारखे असते. हे कळत असूनही माणसे संसारातच खरे सुख मानतात. मोहमायेतच ते अडकून पडतात. आकाशातील ढगांची सावली अस्थिर व क्षणभंगूर असते. तसेच संसारातील सुख हे क्षणभंगूर असते. माणसे मोक्षाचा विचार न करता स्वतःच्या सुखासाठी मी, माझे हा अहंकार बाळगतात. त्याचे मन नेहमीच पत्नी, मुले, धन यातच गुंतलेले असते. पण यातून मिळणारे सुख मृगजळाप्रमाणेच असते. या वासनारूपी मोहजालात अडकल्यामुळे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची कधीच सुटका होत नाही. शेवटी त्यांना मोक्ष मिळत नाही.<br>अशाप्रकारे संत सोयराबाई यांनी माणसाला मोहमायेत अडकवणाऱ्या संसाराची तुलना मृगजळाबरोबर केली आहे. | **3** |
| 4) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>पोटापाण्यासाठी दूर शहरात गेलेल्या कवीला गावाची खूप आठवण येते. या आठवणीत त्याला बाभळीच्या बनाशेजारी असलेल्या आमराईची आठवण येते. ज्या आमराईमध्ये त्याला शांत, स्वस्थ वाटायचे. त्या आमराईच्या गर्द, घनदाट सावलीमध्ये छान झोप लागायची. त्यावेळी वारा जणू अंगाई गात वाहतो आहे, असे वाटायचे. कवीला वेडीवाकडी वळणे घेत वाहणाऱ्या नदीतील खळाळतं पाणीसुद्धा पाहायला आवडायचे. गावातील सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी भिरभिरायची. या नजरेसमोर काळ्याभोर शेतातील हिरवेगार पीकही उभे राहायचे. त्या शेतात कवीचे मन रेंगाळायचे. गावच्या या निसर्गसौंदर्याने कवीचे तन, मन अगदी धुंद होत असायचे.<br>अशाप्रकारे वरील कारणांमुळेच कवीला गावातील आमराई, नदी, शेत आवडते. | **3** |
| 5) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>मानवी समाजामध्ये प्रलय निर्माण व्हावा, असे कवीला वाटते. जेणेकरून एकाच आकाराची, विचाराची, उंचीची, भेदाभेदरहित घरे निर्माण व्हावीत. माणसाला बदलण्यासाठी व माणसाला माणूस म्हणून किंमत यावी यासाठी नवीन विचारांचा समाज निर्माण व्हावा. विषमता नष्ट होऊन सर्वत्र समानता निर्माण व्हावी. 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण व्हावे. माणसाने माणसाशी माणूस म्हणून वागावे. मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध प्राप्त व्हावा.<br>अशाप्रकारे प्रलय होताना मानवी समाजात कवीला सकारात्मक बदल अपेक्षित आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| उ.**5.** | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघेही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही आपल्या चिनारचे कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचं. पण वेळच मिळत नाही. मनातून वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटते.<br>अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटते. | **4** |
| 2) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९२० नंतर स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व म. गांधी यांच्याकडे आले होते. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांच्या सहाय्याने हा लढा तीव्र बनला होता. याच काळात लेखक नागनाथअण्णा कोल्हापूरला 'प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग'मध्ये राहून शिक्षण घेत होते. लेखकाच्या लहानपणी नाना पाटील यांच्या वाळव्यात सभा होत होत्या. तेव्हा लेखक तिरंगी झेंडा खाद्यांवर घेऊन मिरवणुकीत अग्रभागी असायचे. कोल्हापूरात विद्यार्थिदशेतच लेखक राष्ट्रसेवादलात जाऊ लागले होते. तेथे वैचारिक प्रबोधन होत होते. त्या प्रबोधनामुळे इंग्रजांची सत्ता घालविण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावली पाहिजे ही जाणीव तीव्र होत होती. कोल्हापुरमध्ये त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ जोमाने वाढत होती. त्याच निमित्ताने लेखकाने त्याच्या काही विद्यार्थी मित्रांसह मुंबईत धाव घेतली होती. स्वयंसेवकाच्या वेशात प्रवेश मिळविला होता. गांधीजीची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषणाने लेखक भारावून गेले आणि शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून द्यायला तयार झाले होते.<br>अशाप्रकारे नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. | **4** |

| | | |
|---|---|---|
| 3) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गुळ कोल्हापुरी गुळ म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे.<br>अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे. | **4** |
| 4) | 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे.<br>लेखिकेला आपल्या नातवंडांबद्दल खूप प्रेम वाटते. तिला वाटते की, या मुलांना लाड करून घेण्याची, भरभरून प्रेम मिळण्याची सवय झाली आहे. सदैव आपली काळजी घेणारे कोणीतरी आहे हा विश्वास या मुलांना वाटतो. पण ही मुले जशी मोठी होतील तसे त्यांच्या लक्षात येईल की, या जगात वेगवेगळ्या वृत्तींची, स्वभावाची माणसे आहेत. घरात मिळणारे सौजन्यपूर्ण वातावरण बाहेरच्या जगात मिळणार नाही. हिंसा, अभिलाषा, मत्सर या अपप्रवृत्ती समाजात पसरलेल्या आहेत. दुर्दैवाने मुलांना शाळकरी वयात या गोष्टी शिकायला मिळत आहेत. लेखिकेला वाटते की, मुलांनी मोठे होता होता या शत्रूंना जिंकायला पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रत्येक दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करावी. खेळ खेळताना एकत्र खेळावे. शिवाय कुणाविरूद्ध द्वेष ठेवू नये. जितक्या जास्तीत जास्त जणांना आनंद देता येईल तेवढा त्यांनी दिला पाहिजे. साऱ्या जगासाठी त्यांनी स्वतः आदर्श बनले पाहिजे.<br>अशाप्रकारे रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागावे असे लेखिकेला वाटते.<br>**किंवा**<br>**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** | **4** |
| 1) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. | **8** |

| | | |
|---|---|---|
| | लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.<br>१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.<br>याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे.<br>परंतु काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली. | |
| 2) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>संस्कृतीची बाह्य वैशिष्ट्ये ही गावागावाच्या वैशिष्ट्यांवर आणि शहराशहरांच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात. हा विचार मांडताना लेखकाने कोल्हापूर, पंढरपूर व रत्नागिरी या तीन गावांच्या संस्कृतींचे वर्णन केले आहे. लेखक म्हणतात की, सकाळच्या वेळी कोल्हापुरच्या रस्त्यावरून लांब शिंगाच्या गवळट म्हशी दूधकट्ट्यावर दुधाच्या धंद्यासाठी जात असतात. त्याचवेळी पैलवानांचे समूह हातात कल्हई केलेल्या पितळी बादल्या घेऊन दूधकट्ट्यावर जातात. ते पैलवान म्हशीचे ताजे निरसे दूध विकत घेऊन पितात आणि आखाड्यात मेहनतीसाठी जातात. शिवाय काही लोक पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. कोल्हापुरी संस्कृतीचे हे खास वैशिष्ट्य आहे. एकट्या कोल्हापुरात जेवढ्या तालमी | 8 |

| | | |
|---|---|---|
| | आहेत तेवढ्या तालमी महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात दिसणार नाहीत. त्याचबरोबर इथला गुळही स्वतःचे वैशिष्ट्य असलेला आहे. त्याच्या रंगामुळे आणि गंधामुळे कोणालाही तो गूळ खाण्याचा मोह होतोच.<br>कोल्हापूरप्रमाणे पंढरपुरला स्वतःची वेगळी संस्कृती आहे. येथील संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. विठ्ठल मंदिर हे येथील संस्कृतीचे केंद्र आहे. त्यामुळे पंढरपुरात खूप मठ आहेत. वारीच्या वेळी महाराष्ट्रातील हरिभक्त आणि वारकरी या मठात उतरतात. इथल्या गल्ल्यांना, चौकांना आणि दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली आहेत. नदीच्या वाळवंटात टाळ मृदुंग फक्त पंढरपुरातच वाजतात. शिवाय येथल्या चंद्रभागा नदीवरील स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. विठ्ठलाचे ध्यान करीत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात. त्यानंतर घरी जातात. असे हे भक्तियुक्त मानसिक वैशिष्ट्य दुसऱ्या कुठल्याही मराठी शहरी संस्कृतीमध्ये दिसत नाही.<br>कोल्हापूर, पंढरपूर या शहरांप्रमाणेच रत्नागिरीच्या वेगळ्या संस्कृतीची लेखकाने ओळख करून दिली आहे. लेखक म्हणतात की, रत्नागिरीला लाल लाल मातीच्या रस्त्यांचे सुंदर देखणेपण लाभलेले आहे. समुद्राच्या लाटांचा आवाज वातावरणात गंभीरपणे भरून राहिलेला असतो. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, या गोष्टीचे लेखकाला खूप आश्चर्य वाटते. त्याचबरोबर इथला मासळीबाजार खूप मोठा आहे. आणि या मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची एक ओळख आहे. | |
| उ.**6.** | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| 1) | मुंग्या **<u>स्तब्ध</u>** होऊन **<u>ऐकत</u>** होत्या. | **2** |
| 2) | मी **<u>परवा</u>** एक **<u>मुक्त</u>** तुरूंग पाहिला. | **2** |
| उ.**6.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | पंचप्राण - पाच प्राणांचा समूह - द्विगू समास | **1** |
| 2) | मायलेक - माय आणि लेक - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| 3) | दीडदोन - दीड किंवा दोन - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| 4) | पानपत्रावळ - पान, पत्रावळ वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| उ.**6.** | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | भाषेचे मूळ कोणीही पाहू नका. | **1** |
| 2) | आपल्या गाण्याची किंमत पैशात करशील का ? | **1** |
| 3) | आतापर्यंत मी नसती चौकशी कधीही केली नाही. | **1** |

| | | |
|---|---|---|
| उ.**6.** | **ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | दिवाळीच्या प्रसन्न सुरांनी वातावरण **मोहरून गेले**. | **1** |
| 2) | परिस्थितीचे **भांडवल करून** कधी सहानुभूती मिळवू नये. | **1** |
| 3) | तो अपघात मला कायम **अस्वस्थ करतो**. | **1** |
| 4) | राधा काम करताना खूप गोष्टींची **सांडलवंड करते**. | **1** |
| 5) | अभ्यास करत नाही म्हणून आईने रमेशला खेळायला **मनाई केली**. | **1** |
| 6) | वार्षिक परीक्षेत ९० टक्के गुण मिळविण्याची गणेशने **खूणगाठ बांधली**. | **1** |
| उ.**7.** | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| 1) | आपल्याकडे कोणती जिद्द हवी ? | **1** |
| 2) | केशवसुतांनी काय सांगितले आहे ? | **1** |
| 3) | कोणती कामगिरी अवघड आहे ? | **1** |
| 4) | तरूणांनी कसे राहिले पाहिजे ? | **1** |
| उ.**7.** | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 64 - Q.22 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 60 - Q.16 | **4** |
| उ.**7.** | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 94 - Q.09 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 88 - Q.03 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.**7.** | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.103 - Q.09 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.**7.** | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 113 - Q.13 | **4** |
| उ.**8.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 28 - Q.25 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 48 - Q.43 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 16 - Q.14 | **10** |
| | ❑❑❑❑❑ | |